ब)बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व सदर अधिनियमातील महाराष्ट्र राज्य नियमावली २०११ (अद्ययावत दुरुस्त्यांसह) विश्लेषण : बलस्थाने व अडचणी

➢ बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009

➢ अधिनियमाची ठळक वैशिष्ट्ये -

- अधिनियमाचे नाव : बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009.
- अंमलबजावणी **: 01 एप्रिल 2010**
- कार्यक्षेत्र : संपूर्ण भारत
- उद्देश :**06 ते 14 वयोगटातील सर्व बालकांना प्राथमिक** शिक्षण **मोफत व सक्तीचे शिक्षण** पुरविणे
- मर्यादा : धार्मिक शिक्षण देणाऱ्या मदरशांना, वैदिक पाठशाळांना व शैक्षणिक संस्थाना अधिनियम लागू असणार नाही.
- अधिनियम निर्मितीसाठी संविधानातील **कलम : 21 (अ)**
- अधिनियमातील **एकूण प्रकरणाची संख्या : सात**
- अधिनियमातील **एकूण कलमे : 39**
- अधिनियमानुसार प्राथमिक शिक्षणाच्या इयत्ता : पहिले ते आठवी
- अधिनियमानुसार प्राथमिक शिक्षण पूर्ण करून घेण्याची जबाबदारी : राज्यशासन संस्था

कलम 1 - संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ -

या अधिनियमास, **'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009'** असे म्हणावे.

हा अधिनियम, **1 एप्रिल, 2010** रोजी अमलात आला.संविधानाच्या अनुच्छेद 29 व 30 च्या तरतुदींना अधीन राहून या अधिनियमाच्या तरतुदी, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे हक्क प्रदान करण्यासाठी लागू होतील. या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट **मुख्यतः धार्मिक शिक्षण देणाऱ्या मदरशांना, वैदिक पाठशाळांना व शैक्षणिक संस्थांना लागू होणार नाही.**

कलम 2 - व्याख्या -

या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर -

(a) समुचित शासन : याचा अर्थ,

(i)केंद्र सरकारने किंवा विधानमंडळ नसलेल्या संघ राज्यक्षेत्राच्या प्रशासकाने स्थापन केलेल्या, त्यांची मालकी असलेल्या किंवा त्यांचे नियंत्रण असलेल्या शाळेच्या संबंधात **केंद्र सरकार** असा आहे;

(ii)उपखंड (1) मध्ये निर्देशिलेल्या शाळेखेरीज

(A) राज्यक्षेत्रात स्थापन केलेल्या अन्य शाळेच्या संबंधात **राज्यशासन अ**सा आहे;

(B) विधानमंडळ असलेल्या संघ राज्यक्षेत्रात स्थापन केलेल्या अन्य शाळेच्या संबंधात त्या संघ राज्यक्षेत्राचे शासन असा आहे.

b) कॅपिटेशन फी : याचा अर्थ, शाळेने अधिसूचित केलेल्या फी खेरीज अन्य कोणत्याही प्रकारची देणगी किंवा अंशदान किंवा अधिदान असा आहे;

(c) बालक - याचा अर्थ, **सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलगा किंवा मुलगी** असा आहे;

(d) वंचित गटातील बालक : याचा अर्थ, (विकलांगता असलेले बालक किंवा) अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग यांतील किंवा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भौगोलिक, भाषिक, लिंगभेदविषयक घटकांमुळे किंवा समुचित शासन, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य घटकांमुळे वंचित असलेल्या इतर गटातील बालक असा आहे;

(e) दुर्बल घटकातील बालक : याचा अर्थ, समुचित शासनाने अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या किमान मर्यादेहून ज्यांचे **वार्षिक उत्पन्न कमी आहे** अशा माता-पिता यांचे किंवा पालकाचे बालक असा आहे;

(ee) विकलांगता असलेले बालक : यात(a) विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम, 1995 याच्या कलम 2 च्या खंड (i) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, 'विकलांगता' असलेले एखादे बालक; (b) स्वमग्नता, मेंदूचा अर्धांगवायू, मतिमंदता व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम,1999 याच्या कलम 2 च्या (i) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे,विकलांग व्यक्ती असलेले एखादे बालक;

(c) स्वमग्नता, मेंदूचा अर्धांगवायू, मतिमंदता व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम, 1999 याच्या कलम 2 च्या खंड (o) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे गंभीर विकलांगता असलेले एखादे बालक यांचा समावेश होतो.

(f)प्राथमिक शिक्षण: याचा अर्थ, **इयत्ता पहिली ते इयत्ता आठवीपर्यंतचे शिक्षण** असा आहे;

(g)एखाद्या बालकाच्या संबंधात 'पालक' याचा अर्थ, त्या बालकाची
देखभाल करणारी व त्याचा ताबा असलेली व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये नैसर्गिक पालकाचा किंवा न्यायालयाद्वारे किंवा कायद्याद्वारे नियुक्त केलेल्या किंवा घोषित केलेल्या पालकाचा समावेश होतो.

(h) स्थानिक प्राधिकरण : याचा अर्थ, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी महानगरपालिका किंवा नगर परिषद किंवा जिल्हा परिषद किंवा नगरपंचायत किंवा पंचायत, असा आहे आणि त्यामध्ये शाळेवर प्रशासकीय नियंत्रण असलेले किंवा कोणत्याही शहरात, नगरात किंवा गावात 'स्थानिक प्राधिकरण' म्हणून कार्य करण्यासाठी त्या-त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याअन्वये अधिकार प्रदान केलेले असे अन्य प्राधिकरण किंवा निकाय, याचा समावेश होतो;

(i) "राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग" : याचा अर्थ, बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, 2005 याच्या कलम 3 अन्वये स्थापन केलेला राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग असा आहे;

(j) अधिसूचना याचा अर्थ, राजपत्रात प्रसिद्ध केलेली अधिसूचना असा आहे;

(k)माता-पिता : याचा अर्थ, **बालकाचा नैसर्गिक अथवा सावत्र किंवा दत्तक पिता अथवा माता** असा आहे;

(l)विहित : याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

(m) अनुसूची : याचा अर्थ, या अधिनियमाला जोडलेली अनुसूची असा आहे;

(n) शाळा : याचा अर्थ, प्राथमिक शिक्षण देणारी कोणतीही मान्यताप्राप्त शाळा, असा आहे

(0) छाननी पद्धती : याचा अर्थ, एका बालकापेक्षा दुसऱ्या बालकास अधिक पसंती देऊन, त्या बालकाच्या प्रवेशासाठी असलेल्या यादृच्छिक पद्धतीखेरीज, अन्य निवडीची पद्धत असा आहे;

(p) विनिर्दिष्ट प्रवर्ग : याचा अर्थ, एखाद्या शाळेच्या संबंधात, केंद्रीय विद्यालय, नवोदय विद्यालय, सैनिकी शाळा म्हणून ओळखलीजाणारी शाळा किंवा समुचित शासन, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी, विशिष्ट स्वरूप असलेली इतर कोणतीही शाळा असा आहे;

(q) राज्य बालहक्क संरक्षण आयोग : याचा अर्थ, बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, 2005 याच्या कलम 3 अन्वये घटित केलेला राज्य बालहक्क संरक्षण आयोग असा आहे;

प्रकरण दोन : मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क-

कलम 3 - बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क -

1) **सहा ते चौदा वर्षे वयोगटातील** प्रत्येक बालकास त्याचे किंवा तिचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत नजीकच्या शाळेत मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क असेल.
2) कोणतेही बालक, ज्यामुळे त्याला किंवा तिला प्राथमिक शिक्षण घेण्यापासून आणि ते पूर्ण करण्यापासून प्रतिबंध होईल अशा कोणत्याही प्रकारची फी किंवा आकार किंवा खर्च देण्यास तयार असणार नाही.
3)कलम 2 च्या खंड (ee) च्या उपखंड (a) मध्ये निर्दिष्ट केलेले विकलांगता असलेले एखादे बालक, विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण व पूर्ण सहभाग) अधिनियम,1995 याच्या तरतुदींना बाधा येऊ न देता आणि कलम 2 च्या खंड (ee) च्या उपखंड (b) व (c) यांमध्ये निर्दिष्ट केलेले एखादे बालक, यांना विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम, 1995 याच्या प्रकरण पाचच्या तरतुदीन्वये, विकलांगता असलेल्या बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी जे हक्क असतील तेच हक्क असतील; परंतु असे की, स्वमग्नता, मेंदूचा अर्धांगवायू, मतिमंदता व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम, 1999 याच्या कलम 2 च्या खंड (h) मध्ये निर्दिष्ट केलेले 'बहुविध विकलांगता' असलेले एखादे बालक आणि कलम 2 च्या खंड (0) मध्ये निर्दिष्ट केलेले 'गंभीर विकलांगता' असलेले एखादे बालक, यास घरी राहून शिक्षण घेण्याच्या पर्यायाचादेखील हक्क असेल.

कलम 4 -प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश न घेतलेल्या किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण न केलेल्या बालकांसाठी विशेष तरतुदी -

सहा वर्षांपेक्षा अधिक वयाच्या बालकाने कोणत्याही शाळेत प्रवेश घेतलेला नसेल किंवा प्रवेश घेतलेला असला तरी, त्याला किंवा तिला आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करता आले नसेल, तेव्हा त्याला किंवा तिला, त्याच्या किंवा तिच्या **वयाला योग्य असलेल्या वर्गात प्रवेश** देण्यात येईल; परंतु असे की, एखाद्या बालकाने त्याच्या किंवा तिच्या वयाला योग्य असलेल्या वर्गात थेट प्रवेश घेतलेला असेल तेव्हा, त्याला किंवा तिला इतर बालकांबरोबरच विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा कालमर्यादेच्या आत विशेष प्रशिक्षण मिळण्याचा हक्क असेल; परंतु आणखी असे की, प्राथमिक शिक्षणासाठी ज्या बालकास अशा रीतीने प्रवेश देण्यात आलेला असेल ते बालक, वयाची चौदा वर्षे झाल्यानंतरसुद्धा प्राथमिक शिक्षण पूर्ण करेपर्यंत मोफत शिक्षणासाठी हक्कदार असेल.

कलम 5 -दुसऱ्या शाळेत दाखल होण्याचा हक्क -

1.एखाद्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याबद्दलची कोणतीही तरतूद नसेल त्या बाबतीत, एखाद्या बालकास त्याचे किंवा तिचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी कलम 2 च्या खंड (n) चे उपखंड (iii) व (iv) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा वगळून, इतर कोणत्याही शाळेत दाखल करून घेण्याची मागणी करण्याचा हक्क असेल.

2. एखाद्या बालकास कोणत्याही कारणामुळे एक तर राज्यांतर्गत किंवा राज्याबाहेरील एका शाळेतून दुसऱ्या शाळेत जाणे आवश्यक असेल त्या बाबतीत, अशा बालकास, त्याचे किंवा तिचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी कलम 2 च्या खंड (n) चे उपखंड (iii) व (iv) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा वगळून, अन्य कोणत्याही शाळेत दाखल करून घेण्याची मागणी करण्याचा हक्क असेल. अशा अन्य शाळेत प्रवेश घेण्यासाठी, ज्या शाळेत अशा बालकाने शेवटी प्रवेश घेतला होता त्या शाळेचे मुख्याध्यापक किंवा प्रभारी व्यक्ती, ताबडतोब शाळा बदली प्रमाणपत्र देईल; परंतु असे की, शाळा बदली प्रमाणपत्र सादर करण्यात होणारा विलंब हा अशा अन्य शाळेतील प्रवेशासाठी विलंब करण्याचे किंवा प्रवेश नाकारण्याचे कारण ठरणार नाही; परंतु आणखी असे की, शाळा बदली प्रमाणपत्र देण्यास विलंब करणारा त्या शाळेचा मुख्याध्यापक किंवा प्रभारी व्यक्ती ही, त्याला किंवा तिला लागू असलेल्या सेवा नियमांनुसार शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असेल.

प्रकरण तीन : समुचित शासन, स्थानिक प्राधिकरण आणि माता-पिता यांची कर्तव्ये -

कलम 6 - समुचित शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांचे शाळा स्थापन करण्याचे कर्तव्य -

या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी, समुचित शासन आणि स्थानिक प्राधिकरण, विहित करण्यात येईल अशा क्षेत्रात किंवा नजीकच्या क्षेत्राच्या हद्दीत, जेथे कोणतीही शाळा स्थापन केलेली नसेल तेथे या अधिनियमाच्या प्रारंभापासून **तीन वर्षांच्या कालावधीच्या आत अशी शाळा स्थापन** करील.

कलम 7 -आर्थिक व इतर जबाबदाऱ्या वाटून घेणे.

या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता निधी पुरविण्यासाठी **केंद्र सरकार आणि राज्यशासन यांची समवर्ती जबाबदारी** राहील.

कलम 8- समुचित शासनाची कर्तव्ये-

प्रत्येक बालकास मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची तरतूद करील;परंतु असे की, एखाद्या बालकाचा प्रवेश त्याच्या किंवा तिच्या माता-पित्याने किंवा, यथास्थिती पालकाने, समुचित शासन किंवा स्थानिक प्राधिकरण याने स्थापन केलेल्या, त्याची मालकी असलेल्या, त्याचे नियंत्रण असलेल्या किंवा त्याच्याकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पुरविण्यात आलेल्या निधीतून भरीव प्रमाणात वित्त पुरवठा केलेल्या शाळेखेरीज, अन्य शाळेत घेतला असेल त्या बाबतीत, यथास्थिती, असे बालक किंवा त्याचे वा तिचे माता-पिता किंवा त्याचा वा तिचा पालक, अशा अन्य शाळेत बालकाच्या प्राथमिक शिक्षणावर केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी करण्यास हक्कदार असणार नाही.

कलम 9 - स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये

प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची तरतूद करील;परंतु असे की, एखाद्या बालकाचा प्रवेश त्याच्या किंवा तिच्या माता-पित्याने किंवा, यथास्थिती, पालकाने, समुचित शासन किंवा स्थानिक प्राधिकरण याने स्थापन केलेल्या, त्याची मालकी असलेल्या, त्याचे नियंत्रण असलेल्या किंवा त्याच्याकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पुरविण्यात आलेल्या निधीतून भरीव प्रमाणात वित्त पुरवठा केलेल्या शाळेखेरीज, अन्य शाळेत घेतला असेल त्या बाबतीत, यथास्थिती, असे बालक किंवा त्याचे वा तिचे माता-पिता किंवा त्याचा वा तिचा पालक, अशा अन्य शाळेत बालकाच्या प्राथमिक शिक्षणावर केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीची मागणी करण्यास हक्कदार असणार नाही;

कलम 10- माता-पिता व पालक यांचे कर्तव्य

प्रत्येक माता-पित्याने किंवा पालकाने त्याच्या किंवा तिच्या बालकाला किंवा, यथास्थिती, पाल्याला नजीकच्या शाळेत प्राथमिक शिक्षणासाठी दाखल करणे किंवा दाखल करण्याची 'व्यवस्था करणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

कलम 11- समुचित शासनाने शाळापूर्व शिक्षणाची तरतूद करणे.

तीन वर्षांवरील बालकांना प्राथमिक शिक्षण घेण्यास तयार करण्याच्या आणि सर्व बालकांसाठी, त्यांच्या वयाची सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत प्रारंभिक बाल्यावस्थेतील देखभाल आणि शिक्षण यांची तरतूद करण्याच्या हेतूने समुचित शासनास, अशा सर्व बालकांना मोफत शाळापूर्व शिक्षण देण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करता येईल.

प्रकरण चार : शाळांच्या व शिक्षकांच्या जबाबदाऱ्या -

कलम 12 -मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाबाबत शाळेच्या जबाबदारीची व्याप्ती

1.या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ (a) कलम 2 च्या खंड (n) च्या उपखंड (i) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा, त्या शाळेत प्रवेश घेतलेल्या सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देईल;

(b) कलम 2 च्या खंड (n) च्या उपखंड (ii) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा, तिचा वार्षिक सरासरी खर्च सोसण्यासाठी तिला जे वार्षिक आवर्ती साहाय्य किंवा अनुदान मिळेल त्या प्रमाणात प्रवेश घेतलेल्या बालकांना, परंतु किमान पंचवीस टक्क्यांच्या अधीन राहून, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देईल; (c) कलम 2 च्या खंड (n) च्या उपखंड (iii) व (iv) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शाळा, **नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थिसंख्येच्या** किमान २५ टक्के **मर्यादिपर्यंत प्रवेश देईल** आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल;

कलम 13- प्रवेशासाठी कोणतीही कॅपिटेशन फी किंवा छाननी पद्धती नसणे.

कोणतीही शाळा किंवा व्यक्ती बालकाला प्रवेश देताना, कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकास किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही. कोणतीही शाळा किंवा व्यक्ती, पोटकलम (1) च्या तरतुदींचे उल्लंघन करून(a)कॅपिटेशन फी घेईल तर ती, आकारलेल्या कॅपिटेशन फी च्या दहा पट असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल;

(b) एखाद्या बालकास छाननी पद्धतीसाठी भाग पाडील तर**, ती पहिल्या उल्लंघनाबद्दल पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल आणि त्यानंतरच्या प्रत्येक उल्लंघनाबद्दल पन्नास हजार रुपयांपर्यंत** असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

कलम 14 -प्रवेशासाठी वयाचा पुरावा

प्राथमिक शिक्षणाकरिता प्रवेशाच्या प्रयोजनांसाठी, बालकाचे वय **हे जन्म, मृत्यू व विवाहनोंदणी अधिनियम, 1886** याच्या तरतुदींनुसार देण्यात आलेल्या जन्माच्या दाखल्याच्या आधारे किंवा विहित करण्यात येईल अशा अन्य कोणत्याही दस्तऐवजाच्या आधारे निर्धारित करण्यात येईल. वयाच्या पुराव्याच्या अभावी कोणत्याही बालकास, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

कलम 15 -प्रवेश देण्यास नकार न देणे.

बालकास, शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला किंवा विहित करण्यात येईल अशा वाढीव कालावधीमध्ये शाळेत प्रवेश देण्यात येईल. परंतु असे की वाढीव कालावधीनंतर जर असा प्रवेश मागितला असेल तर कोणत्याही बालकास प्रवेश नाकारण्यात येणार नाही. परंतु आणखी असे की वाढीव कालावधीनंतर प्रवेश देण्यात आलेले कोणतेही बालक, समुचित शासनाद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने त्याचा अभ्यास पूर्ण करील.

कलम 16 - मागे ठेवण्यास व काढून टाकण्यास मनाई

शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास, कोणत्याही इयत्तेत मागे ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

कलम 17 - बालकास शारीरिक शिक्षा करण्यास आणि मानसिक त्रास देण्यास मनाई

कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

कलम 18- मान्यता प्रमाणपत्र मिळविल्याशिवाय कोणतीही शाळा स्थापन न करणे.

जी कोणतीही व्यक्ती, मान्यता प्रमाणपत्र मिळविल्याखेरीज एखादी शाळा स्थापन करील किंवा चालविल किंवा मान्यता काढून घेतल्यानंतरही शाळा चालूच ठेवील. **ती एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास** आणि ज्या कालावधीत असे उल्लंघन करण्याचे चालू ठेवले असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसाकरिता दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

कलम 19- शाळेसाठी असलेली मानके आणि प्रमाणके

परंतु असे की, एखाद्या शाळेने कलम 19 अन्वये प्रमाणके आणि मानके यांची पूर्तता केल्याखेरीज, अशा शाळेला मान्यता देण्यात येणार नाही. मान्यतेसाठीच्या शर्तीचे उल्लंघन केल्यावर विहित प्राधिकरण लेखी आदेशाद्वारे मान्यता काढून घेईल; परंतु, असे की, अशा प्रकारे मान्यता काढून घेतलेल्या शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना नजीकच्या कोणत्या शाळेत प्रवेश घेता येईल त्याबद्दलचे निदेश, अशा आदेशात दिलेले असतील,परंतु, आणखी असे की, अशा शाळेला, विहित करण्यात येईल अशा रीतीने आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज, अशा प्रकारे मान्यता काढून घेण्यात येणार नाही.

जी कोणतीही व्यक्ती, मान्यता काढून घेतल्यानंतर शाळा चालविणे सुरूच ठेवील **ती एक लाख रुपयांपर्यंत** असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि ज्या कालावधीत असे उल्लंघन करण्याचे चालू ठेवले असेल त्या कालावधीतील **प्रत्येक दिवसाकरिता दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.**

कलम 20 -अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार

केंद्र सरकारला अधिसूचनेद्वारे अनुसूचीमध्ये कोणतीही मानके आणि प्रमाणके यांची भर घालून किंवा ती वगळून त्या अनुसूचीची सुधारणा करता येईल.

कलम 21 -शाळा व्यवस्थापन समिती-

1. कलम 2 खंड (n) उपखंड (iv) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शाळेखेरीज इतर शाळा, एक शाळा व्यवस्थापन समिती घटित करील. या समितीमध्ये, स्थानिक प्राधिकरण अशा शाळेत प्रवेश दिलेल्या बालकांचे माता-पिता किंवा पालक आणि

शिक्षक यांच्यामधून निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा समावेश असेल;परंतु असे की, **अशा समितीतील किमान तीन चतुर्थांश सदस्य हे माता-पिता किंवा पालक असतील**; परंतु आणखी असे की, वंचित गटातील आणि दुर्बल घटकातील बालकांचे माता-पिता किंवा पालक यांना प्रमाणशीर प्रतिनिधित्व देण्यात येईल; परंतु तसेच **अशा समितीतील पन्नास टक्के सदस्य या महिला असतील.**

कलम 22 -शाळा विकास योजना-

कलम 21 च्या पोटकलम (1) अन्वये घटित करण्यात आलेली प्रत्येक शाळा व्यवस्थापन समिती, विहित करण्यात येईल अशा रीतीने शाळा विकास योजना तयार करील.

कलम 23 शालेय शिक्षकांच्या नियुक्ती संदर्भातील अर्हता आणि सेवच्या अटी व शर्ती :

केंद्र सरकारकडून अधिसूचनेद्वारे प्राधिकृत केलेल्या शैक्षणिक प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात येणारी किमान पात्रता धारण करणारी कोणतीही व्यक्ती शिक्षक म्हणून नियुक्त केली जाण्यास पात्र असेल

2.एखाद्या राज्यात अध्यापकाचे प्रशिक्षण देणाऱ्या पुरेशा प्रशिक्षण संस्था नसतील तर किंवा किमान आर्हता धारण करणारे पुरेसे शिक्षक उपलब्ध होत नसतील तर केंद्र सरकार आवश्यक त्या वेळी अधिसूचनेद्वारे तीत नमूद करण्यात येईल अशा 5 वर्षाहून अधिक नसलेल्या कालावधीकरिता शिक्षकांची नियुक्ती करण्यासाठी आवश्यक असलेली किमान अर्हता शिथिल करेल. असे **शिक्षक 5 वर्ष कालावधीच्या आत किमान अर्हता प्राप्त** करतील.

31 मार्च 2015 पासुन नियुक्त झालेले शिक्षक पोटकलम (1) अन्वये 4 वर्षाच्या आत किमान आर्हता प्राप्त करतील.

कलम 24- शिक्षकांची कर्तव्ये आणि त्यांच्या गा-हाण्यांचे निवारण

कलम 23, पोटकलम (1) अन्वये नियुक्त केलेला शिक्षक पुढील कर्तव्ये पार पाडील;

a)शाळेत नियमितपणे व वक्तशीरपणे हजर राहणे;

b)कलम 29, पोटकलम (2) च्या तरतुदींनुसार अभ्यासक्रम घेणे व तो पूर्ण करणे;

(c) विनिर्दिष्ट कालावधीत संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करणे;

(d) प्रत्येक बालकाच्या अध्ययन क्षमतेचे निर्धारण करणे आणि त्यानुसार कोणतीही आवश्यकता भासल्यास, पूरक म्हणून अतिरिक्त शिक्षण देणे;

(e) माता-पिता आणि पालकांबरोबर नियमित पालकसभा घेऊन, त्यांना बालकांची नियमित हजेरी, अध्ययन क्षमता, अध्ययनातील प्रगती याबाबतची माहिती आणि बालकांशी संबद्ध अशी इतर कोणतीही माहिती देणे; आणि विहित करण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

(f) 2. पोटकलम (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्ये पार पाडण्यात जो शिक्षक कसूर करील, तो, त्याला अथवा तिला लागू असलेल्या सेवानियमान्वये शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास पात्र असेल; परंतु असे की, अशी शिस्तभंगाची कारवाई करण्यापूर्वी, अशा शिक्षकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(e) बालकानुकूल व बालककेंद्री पद्धतीने उपक्रम, शोध व संशोधन या माध्यमातून शिक्षण;

(f) व्यवहार्य असेल तेथवर शिक्षणाचे माध्यम बालकाची मातृभाषा असेल;

(8) बालकाला भय, दडपण व चिंता यांपासून मुक्त ठेवणे आणि मुक्तपणे विचार व्यक्त करण्यास मदत करणे;

(h)बालकाची आकलनशक्ती आणि तिचा उपयोग करण्याच्या त्याच्या किंवा तिच्या क्षमतेचे सर्वंकष व सातत्याने मूल्यमापन करणे.

कलम 25 विद्यार्थी-शिक्षक प्रमाण :

विद्यार्थी-शिक्षक प्रमाण समुचित शासन आणि स्थानिक प्राधिकरणाकडून सुनिश्चित करण्यात येईल.शाळेत नेमणूक झालेल्या कोणत्याही शिक्षकास विद्यार्थी-शिक्षक प्रमाण राखण्यासाठी इतर कोणत्याही शाळेत किंवा कार्यालयात काम करण्यास भाग पाडले जाणार नाही. शिक्षकास दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारण आणि निवडणूक कर्तव्य याखेरिज इतर कोणतीच अशैक्षणिक कामे लावण्यात येणार नाही.

कलम 26 शिक्षकाची रिक्त पदे भरणे :

प्रस्तुत अधिनियमानुसार शाळेतील **शिक्षकांच्या एकूण मंजूर पदापैकी 10% पेक्षा अधिक पदे रिक्त असणार** नाहीत याची काळजी घेण्यात येईल.

कलम 27 शिक्षकांच्या अशैक्षणिक कार्याच्या नियुक्ती संदर्भात :

कोणत्याही शिक्षकास (1) दशवार्षिक जनगणना, (2) आपत्ती निवारण आणि (3) स्थानिक प्राधिकरण राज्य विधानमंडळे किंवा संसद निवडणूक कर्तव्याखेरीज इतर कोणत्याही अशैक्षणिक प्रयोजनासाठी कामावरती नियुक्त करण्यात येणार नाही.

कलम 28 शिक्षकाने खासगी शिकवणी घेण्यास मनाई :

प्रस्तुत अधिनियमानुसार कोणताही शिक्षक खासगी शिकवणी घेणार नाही किंवा खासगी शिकवणीच्या कामात कसलाही सहभाग नोंदवणार नाही

प्रकरण पाच -प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण करणे

कलम 29 अभ्यासक्रम व मूल्यमापन प्रक्रिया :

शासन अधिसुचनेद्वारे प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम व मूल्यमापन योजना शिक्षण प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात येईल.

कलम 30- परीक्षा व पूर्णता प्रमाणपत्र

. कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही. प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने प्रमाणपत्र देण्यात येईल.

प्रकरण सहावे -बालकाच्या शिक्षणाच्या हक्काचे संनियंत्रण –

कलम 31 बालकाच्या शिक्षणाच्या हक्काचे संनियंत्रण :

बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, 2005 कलम (3) अन्वये स्थापन करण्यात आलेला राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग किंवा कलम 17 अन्वये स्थापन करण्यात आलेला राज्य बालहक्क संरक्षण आयोगबालहक्काच्या संरक्षक उपाययोजनाची प्रभावी अंमलबजावणी करणे हे देखील कार्य पार पाडेल .

कलम 32- गाऱ्हाण्यांचे निवारण

बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्कांशी संबंधित तक्रारींची चौकशी करणे; आणि कलम 31 मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये कोणत्याही व्यक्तीला एखाद्या बालकाच्या हक्काशी संबंधित कोणतेही गाऱ्हाणे मांडावयाचे असल्यास तिला, अधिकारिता असलेल्या स्थानिक प्राधिकरणाकडे लेखी तक्रार करता येईल.

2. पोटकलम (1) अन्वये तक्रार प्राप्त झाल्यानंतर, स्थानिय प्राधिकरण, संबंधित पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची आत, वाजबी संधी दिल्यानंतर, तीन महिन्यांच्या कालावधीच्या त्या बाबींवर निर्णय देईल.

स्थानिक प्राधिकरणाच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, राज्य बालहक्क संरक्षण आयोगाकडे किंवा यथास्थिती, कलम 31, पोटकलम (3) अन्वये विहित केलेल्या प्राधिकरणाकडे अपील करता येईल.

कलम 33 राष्ट्रीय सल्लागार परिषद घटित करणे,

या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत केंद्र सरकारला सल्ला देणे हे राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे कार्य असेल. केंद्र सरकार, प्राथमिक शिक्षण व बालविकास या क्षेत्रातील ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या व्यक्तीमधून नेमणूक करावयाच्या, केंद्र सरकारला आवश्यक वाटतील. परंतु पंधराहून अधिक नसतील इतक्या सदस्यांची मिळून बनलेली राष्ट्रीय सल्लागार परिषद, अधिसूचनेद्वारे घटित करील.

कलम 34 -राज्य सल्लागार परिषद घटित करणे.

राज्यशासन प्राथमिक शिक्षण व बालविकास या क्षेत्रातील ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या व्यक्तींमधून नेमणूक करावयाची,राज्यशासनास आवश्यक वाटतील. परंतु पंधराहून अधिक नसतील इतक्या सदस्यांची मिळून बनलेली राज्य सल्लागार परिषद, अधिसूचनेद्वारे घटित करील.

या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत राज्यशासनास सल्ला देणे हे राज्य सल्लागार परिषदेचे कार्य असेल.

राज्य सल्लागार परिषदेच्या सदस्यांचे भत्ते व त्यांच्या नेमणुकीच्या अन्य अटी व शर्ती विहित करण्यात येतील अशा असतील.

प्रकरण सात : संकीर्ण

कलम 35 -निर्देश देण्याचा अधिकार

केंद्र सरकारला, या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास योग्य वाटतील अशी मार्गदर्शक तत्त्वे समुचित शासनाला किंवा यथास्थिती, स्थानिक प्राधिकरणाला ठरवून देता येतील. समुचित शासनास, या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणण्याच्या संबंधात, त्यास योग्य वाटतील अशी मार्गदर्शक तत्त्वे व असे निदेश, स्थानिक प्राधिकरणाला किंवा शाळा व्यवस्थापन समितीला देता येतील.

कलम 36 खटला भरण्यासाठी पूर्वमंजुरी घेणे.

कलम 13 चे पोटकलम (2) कलम 18 चे पोटकलम (5) आणि कलम 19 चे पोटकलम (5) या खालील शिक्षापात्र असलेल्या अपराधांबद्दलचा कोणताही खटला, समुचित शासनाने अधिसूचनेद्वारे या बाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय दाखल करता येणार नाही.

कलम 37 सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण

या अधिनियमाद्वारे करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा आदेश याअन्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कार्यवाही संबंधात केंद्र सरकार, राज्यशासन, राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग, राज्य बालहक्क संरक्षण आयोग, स्थानिक प्राधिकरण, शाळा व्यवस्थापन समिती किंवा कोणतीही व्यक्ती,यांच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही केली जाणार नाही.

कलम 38- समुचित शासनाचा नियम करण्याचा अधिकार

समुचित शासनास, या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

कलम 39- केंद्र सरकारचा अडचणी दूर करण्याचा अधिकार

या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवली तर, केंद्र सरकारला राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, अडचण दूर करण्यासाठी त्याला आवश्यक वाटेल अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करता येतील; परंतु असे की, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (सुधारणा) अधिनियम, 2012 याच्या प्रारंभापासून तीन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, या कलमान्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही. या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.